८. विशेष मार्गदर्शन वर्ग :-

अभ्यासक्रमात असलेल्या कठीन वाटणाऱ्या विषयाबाबत न्यूनगंड कमी व्हावा. विषयाबाबत आत्मविश्वास वाढावा म्हणून सरावाचे आयोजन करुन या गरजू विद्यार्थीनींना मागदर्शन केले जाते.

९. सांस्कृतिक मंडळ :-

महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या कलागुणांचा आविष्कार करण्यासाठी सांस्कृतिक मंडळ कार्यशील असते. विद्यार्थीनींमधील गायन, अभिनय, वादन, विनोदबुद्धी, प्रगल्भता या गुणांना व्यासपीठ मिळावे म्हणून नाटक, एकांकिका, नाट्यछटा, एकपात्री प्रयोग, पथनाट्य या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते चालू घडामोडीतील सामाजिक,राजकीय शैक्षणिक ज्वलंत प्रश्नांवर आपले परखड मत मांडता यावे म्हणून वादविवाद स्पर्धा घेण्यात येतात. तसेच त्या-त्या वर्षी काही विशेष उपक्रम असतील तर त्यांचे आयोजन केले जाते.

१०. माजी विद्यार्थीनी संघ :-

माजी विद्यार्थीनी हा महाविद्यालयाचा अतिशय महत्वाचा घटक आहे. स्वत:ला आलेल्या अडचणी, अपूर्ण गरजा व उणीवांवर मात करत समाजाच्या जबाबदार घटक बनलेला असतो तो महाविद्यालयाचा व विद्यार्थीनीचा मित्र व हितचिंतक बनून समस्यांवर मात करण्याची प्रेरणा देऊ शकतो. तसेच तो महाविद्यालयात माजी विद्यार्थीनी संघ स्थापन करण्यात आला आहे.

११. शिष्यवृत्ती :-

विद्यार्थीनींसाठी सरकारी वर्गवारीनुसार ओ.बी.सी. (OBC) एस.सी (SC) एन.टी. (NT) एस.टी. (ST) एस.बी.सी. (SBC) इ. वर्ग संवर्गानुसार शिष्यवृत्ती उपलबध आहेत. त्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) शाखा अक्कलकुवा येथे विद्यार्थीनीने स्वत:चे बचत खाते (Saving Ac. उघडून इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता वेळेवर करणे बंधनकारक आहे.

१२. व्यसनमुक्ती अभियान :-

बिडी, तंबाखू, गुटखा आदि पदार्थाचे सेवन टाळण्यासाठी महाविद्यालयात व्यनमुक्ती अभियान चालविले जाते.या अभियानात सामज, विद्यार्थीनी तसेच कर्मचारी यांचा सामाजिक जाणिवेतून समावेश केलेला आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी व्यसनमुक्ती प्रचार, प्रसाराचा कार्यकर्ता असावा म्हणून त्याच्यासाठी तज्ञांचे, समुपदेशकांचे मार्गदर्शन उपलब्ध केले जाते. विद्यार्थीनींना व्यसनांच्या दुष्परिणामांची जाणीव निर्माण व्हावी म्हणून निबंध स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धांचे आयोजन केले जाते. महाविद्यालय परिसरात मादक पदार्थाचे सेवन करणाऱ्या विद्यार्थीनी व कर्मचाऱ्यांना दंड केला जातो.

१३. पालसंघ :-

विद्यार्थीनीसाठी सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षक-पालक-विद्यार्थीनी यांच्यात समन्वय साधण्यासाठी पालकसंघ स्थापन करण्यात आलेले आहे. परिसराच्या गरजा, रोजगारी संधी, नवीन अभ्यासक्रम व उपक्रम याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व वर्तमान जीवनातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थीनी सबल, समर्थ व्हावा, त्याचा आत्मविश्वास वाढावा, त्याची प्रगती व्हावी, इतर दृष्टिकोन समोर ठेऊन पालकसंघ कार्यरत आहे. पालकांच्या वेळोवेळी बैठका होतात. त्यामध्ये विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास, शिक्षण विस्तार, लोकशिक्षण इ. उपक्रमांबाबत विचारविनिमय केला जातो व महाविद्यालय प्रशासनास मौलिक सूना केल्या जातात.

१४. तक्रार निवारण कक्ष :-

महाविद्यालयाची शिस्त व अनुशासन राहावे यासाठी महाविद्यालयीन नियमांच्या उल्लघंनाबाबत काही तक्रार असल्यास तक्रार निवारण कक्षाद्वारे विद्यार्थीनी, कर्मचारी, प्राध्यापक यांना परस्पर विरुद्ध तक्रार दाखल करता येतील. संबंधित व्यक्तीस आपलीलेखी ना पेटीमध्ये टाकता येईल. सदर समिती तक्रारीची दखल घेऊन तक्रार निवारण करील अुवा दोषींवर योग्य ती दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

रुरल फौंडेशन, नंदुरबार

* संचालक मंडळ *

अ.नं.	नांव	हुद्दा
१	श्री. आप्पासो. प्रकाश बी. पाटील	अध्यक्ष
२	श्री. ब्रिजलाल पी. पाटील	उपाध्यक्ष
३	श्री. प्रेमदयाल एन. पटेल	संचालक
४	श्री. मदनभाई एन. पटेल	संचालक
५	सौ. मंगलाबेन पी. पटेल	संचालिका
६	सौ. उज्वलाबेन डी. पाटील	संचालिका
७	सौ. सुमनबेन टी. पाटील	संचालिका
८	श्री. गुलाबसिंग पी. पाडवी	सचिव

रुरल फौंडेशन नंदुरबार संचलित

शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय,

अक्कलकुवा, जि. नंदुरबार- ४२५४१५

(एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नित)



माहिती-पत्रक

* अध्यक्ष *

श्री. आप्पासो. प्रकाश बी. पाटील

Scanned with CamScanner

रुरल फौंडेशन नंदुरबार संचलित

शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार

* संस्था :-

अक्कलकुवा हा सातपुड्याच्या पायथ्याशी असलेला नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम, डोंगराळ, ग्रामीण अविकसीत आदिवासी तालुका आहे. सन २००५ साली रुरल फौन्डेशन नंदुरबारचे चेअरमन श्री. आप्पासो. प्रकाश बी. पाटील यांनी अक्कलकुवा तालुक्यात आदिवासी, ग्रामीण व सातपुडा या डोंगराळ भागीतल विद्यार्थीनींना उच्च शिक्षणाची शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. तसेच विद्यार्थीनींना बी. एड. अध्ययनाची निवड आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालयाचा श्रीगणेशा केला. हे महाविद्यालय अकलेश्वर- बऱ्हाणपूर या राष्ट्रीय महामार्गावर अक्कलकुवाच्या पश्चिमेस सोरापाडा या गावी आहे. आमचे महाविद्यालय हे तालुक्यातील एकमेव शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय आहे. महाविद्यालयाची प्रशस्त इमारत ही एक एकर जागे मध्ये निसर्गरम्य परिसरात उभारलेली आहे. आमचे महाविद्यालय हे तालुक्यातील एकमेव बी. एड. महाविद्यसलय आहे. आमचे महाविद्यालय हे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नित असून महाविद्यालयात एकूण १० प्राध्यापक व ४ प्राध्यापकेतर कर्मचार आणि ३ शिपाई आहेत.

याचाच फलश्रुती म्हणून महाविद्यलयातील विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त केलेले आहे. विद्यार्थीनींनी नेट/सेट/गेट या सारख्या परीक्षेमध्ये यश प्राप्त करुन महाविद्यालयाने गुणवान विद्यार्थीनीं तयार करण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

आदिवासी ग्रामीण व होतकरू विद्यार्थीनींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून, समाज उपयोगी भावना निर्माण करुन बलशाली भारत तयार करणे हे महाविद्यालयाचे एकच ध्येय आहे.

* महाविद्यालयाचे ध्येय, दूरदृष्टी व उद्देश

:- ध्येय (Goal)

०- आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थीनींसाठी उच्च शिक्षणाची संधी देणे व त्याद्वारे उत्कृष्टता प्राप्त करणे.
०- विद्यार्थीनींना दृकश्राव्य साधनांचा माध्यमातून ज्ञान प्रदान करणे.
०- आपल्याला जे काही ज्ञान प्राप्त झालेले आहे त्याचा समाजविकासाठी उपयोग करुन समाजाप्रति कृतज्ञता व्यक्त करणे.
०- विद्यार्थीनींना मानवतावादी सर्जनात्मक, चिकित्सक,प्रभावी शिक्षिका होण्यास संधी देणे.
०- अध्ययन- अध्यापन प्रक्रिया मनोरंजनात्मक व अनुभवाधिष्ठित बनविणे.
०- विद्यार्थीनी शिक्षिकांना स्वत:त लपलेले सुप्त गुण व बलस्थाने ओळखण्यास मदत करणे.
०- आजच्या स्पर्धात्मक युगातील जागतिकिकरणातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनविणे.
०- आदर्श व गुणवत्तापूर्वक शिक्षिका तयार करणे.
०- दृकश्राव्य साधनाद्वारे ज्ञान प्रदान करणे.

:- दूरदृष्टी (Vision) :-

०- विद्यार्थीनींचा सर्वांगीण विकास करणे.
०- निसर्ग संवर्धन करणे.
०- विद्यार्थीनींमध्ये सामाजिक भावना वाढवणे.
०- विद्यार्थीनींमध्ये चांगल्या गुणांची रुजवणूक करणे.
०- स्पर्धा परीक्षेसाठी प्रवृत्त व प्रेरित करणे.
०- विद्यार्थीनींना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे.
०- विद्यार्थीनींना आत्मनिर्भर बनविणे.
०- समाज विकासासाठी आदर्श शिक्षिका तयार करणे.

:- उद्देश (Mission) :-

०- गुणात्मक पद्धतीने शिक्षण देणे.
०- विद्यार्थीनींना त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठीही मार्गदर्शन करणे.
०- विद्यार्थीनींना अभ्यासपूरक व अभ्यासेइतर आवश्यक कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी प्रवृत्त करणे.
०- समाजशील आणि राष्ट्रप्रेमी नागरिक तयार करणे.
०- पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थीनींना जलसंवर्धन व वृक्षसंवर्धन करिता प्रवृत्त करणे.
०- सद्याच्या समस्यांची जाणिव करुन देऊन देशाकरिता यशस्वी नेतृत्व तयार करणे.
०- शिक्षण आणि सामाजिक मुल्ये यामध्ये संतुलन निर्माण करणे.

:- विद्यार्थीनींच्या वर्तनासंबंधी नियम :-

१. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थीनींनी आपले ओळखपत्र सतत जवळ बाळगणे आवश्यक आहे.
२. महाविद्यालयाच्या आवारात पान व तंबाखूजन्य पदार्थ खाण्यास, धुम्रपान तसेच मादक पदार्थाचे सवेक करण्यास सक्त मनाई आहे. याविरुद्ध वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मुंबई पोलीस नियमावली १९५१ नुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
३. प्राचार्यांच्या पुर्व परवानगी शिवाय महाविद्यालयाच्या आवारात कोणतेही मंडळ, कार्यक्रम, संघटना अथवा संस्था स्थापन करता येणार नाही.
४. विद्यार्थीनींनी महाविद्यालयाशी संबंधीत कोणतीही माहिती वृत्तपत्रात देण्या पुर्वी मा. प्राचार्य यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
५. सहल आयोजित करण्यापुर्वी मा. प्राचार्य यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
६. महाविद्यालयाच्या स्थावर मालमत्तेची विद्यार्थ्यांनी योग्य ती जोपासना करावी तिला सुस्थितीत ठेवण्यास मदत करावी. महाविद्यालयाच्या इमारतीच्या भिंतीवर, खिडक्यांवर, दरवाज्यांवर लिहणे, खिडकीच्या काचा फोडणे, फर्निचरची मोडतोड करणे इ.गोष्टी शिस्तबाह्य समजल्या जातील व अश्या विद्यार्थीनीस शिक्षा करण्याचा व प्रवेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना राहील.
७. वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचना काळजी पुर्वक वाचाव्यात. न वाचल्यामुळे आर्थिक किंवा शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास संबंधीत विद्यार्थी जबाबदार राहील.
८. विद्यार्थिनीस महाविद्यालयात कोणी त्रास देत असल्यास त्या संबंधिची सूचना/माहिती प्राचार्यांना द्यावी. वाद व भांडणे परस्पर अयोग्य मार्गाने सोडवू नयेत. तसेच त्यासाठी बाहेरील व्यक्तींना आणू नये.
९. वर्गात आपल्या वागण्याने कुठल्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही याची खबरदारी विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे.
१०. विद्यापीठ व महाविद्यालयाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
११. महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थीनी कोठेही अर्ध वेळ/पुर्ण वेळ नोकरीला नसावा, तसेच त्याने आपल्या विद्यापीठा अंतर्गत किंवा दुसऱ्या विद्यापीठा अंतर्गत इतर कुठल्याही महाविद्यालयात प्रवेशीत नसावा.
१२. रॅगींग हा दखलपात्र गुन्हा आहे. प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रॅगींग होईल अश्या वर्तणूकीची गंभीर दखल घेतली जाऊन संबंधीत विद्यार्थीनींवर कठोर कारवाई होईल.
१३. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थीनींनी मोबाईल फोन आणू नये. कोणत्याही विद्यार्थीनीं जवळ मोबाईल आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
१४. वरील नियमांमध्ये ज्या बाबींचा समावेश नाही. त्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना राहील.

१. महाविद्यालय इमारत :-

महाविद्यालयाची इमारत नैसर्गिक सानिध्यात प्रशस्त व सुसज्ज अशी इमारत आहे.

२. ग्रंथालय :-

महाविद्यालयाचे समृद्ध ग्रंथालय आहे. ग्रंथालयात सर्व विषयावरील सुमारे १५०० संच आहेत. यात क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच अवांतर वाचनाची, सामान्य ज्ञानाची भरपूर पुस्तके आहेत. विद्यार्थ्यांना अनामत रक्कम भरुन आपल्या खात्यावर पुस्तके घेता येतात. ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्ष उपलब्ध आहे. यात विद्यार्थ्यांना क्रमिके पुस्तके, संदर्भ ग्रंथ, व्यवसाय मार्गदर्शन व विविध स्पर्धा परिक्षांची पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. तसेच स्पर्धा परिक्षाची जुने प्रश्न संच उपलब्ध करुन दिले जातात.नवीन विद्यार्थ्यांसाठी Libray orientation programme अंतर्गत ग्रंथालयाची माहिती देण्यात येते.

३. निसर्गरम्य परिसर :-

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शुद्ध व नैसर्गिक हवेचा पुरवठा व्हावा, अभ्यासासाठी विस्तृत छाया यासाठी सर्व इमारतीच्या आजूबाजूला व महाविद्यालयाच्या आवारात निंबांच्या झाडांची लागवड करण्यात आलेली आहे.

४. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :-

विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

५. व्यवसाय मार्गदर्शन :-

यामध्ये वेगवेगळे व्यवसाय सुरु करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते.

६. प्लेसमेंट सेल :-

महासविद्यालय प्लेसमेंट सेल कार्यरत असून त्यामार्फत नोकरीसाठी असलेल्या संधी विद्यार्थीनीच्या निदर्शनास आणून दिल्या जातात.विविध आ।द्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपन्यांशी सुसंवाद साधून महाविद्यालया मध्ये कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले जाते. अनेक विद्यार्थीनी या कॅम्पस मुलाखतीचा फायदा करून घेतला आहे. या उपक्रमाद्वारे अनेक विद्यार्थीनींना नामांकित कंपन्यात नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

७. संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास योजना :-

ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होण्याकरिता एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरु यांच्या प्रेरणेतून महाविद्यालयात वरील शिबीराचे वर्षातून तीन वेळेस आयोजन केले जाते. यामध्ये तज्ञ मार्गदर्शक हे विद्यार्थीनींना संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन करतात. प्रत्येक शिबीराचा कालावधी दहा दिवसांचा असतो.

Scanned with CamScanner